स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत राज्यशाख विषयातील पीएच. डी

(Doctor of Philosophy)

पदवीकरिता सादर करावयाच्या संशोधन आराखडा (Synopsis)

संशोधन विषय

शिवाजीराव शिवरामजी मोघे यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास

संशोधक

सुवर्णा तुकाराम खुडे

(एम. ए. बी. एड)

मार्गदर्शक

प्रा. डॉ खान आय. जी.

(एम.ए., एम. फील., पीएच. डी., सेट)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक श्री रेणुकादेवी महाविद्यालय,

माहूर ता. माहूर, जि. नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज नांदेड

डिसेंबर 2024

"शिवाजीराव शिवरामजी मोघे यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास"

प्रस्तावना :

समान्य कुटुंबातील विद्याविभूशीत चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्व असलेले शिवाजीराव मोघे यांच जीवन म्हणजे महाराष्ट्रातील दुर्बल गोर-गरीब घटकाच्या प्रगतीसाठी आयुष झिझना-या एका झुंजार कार्यकर्त्याचा सामाजिक वा राजकीय संघर्षमय इतिहास आहे. यवतमाळ नद्यांच्या संगमावर वसलेले गाव संगऋषि च्या वास्तव्याचे ठिकाण बहुसंख्य आंध आदिवासी व बंजारा वस्ती असलेल्या निसर्गाच्या कुशीतील मरसुळ या खेडे गावात शिवरामजी मोघे व शेवंताबाई मोघे या आदिवासी दामपत्याच्या पोटी सन 27 मार्च 1945 रोजी पुत्ररत्न श्री. शिवाजीराव मोघे जन्माला आले.

शिवाजीराव शिवरामजी मोघे यांना शिक्षणासाठी खडतळ प्रवास करावा लागला. सन 1951 साली मरसुळ च्या गुरुकुल मध्ये ईयता पहीली मध्ये प्रवेश केला व आपले शैक्षणिक वाटचाल सुरू केली व एच. एस. सी. 1962 साली लोकहीत विद्यालय, पुसद येथुन उत्तीर्ण केली आणि बी.कॉम फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथुन पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी वकीलीचा अभ्यास करण्यासाठी युनिव्हर्ससीटीला प्रवेश घेतला. वकीलीचा अभ्यास पूर्ण करूण दारव्हा व यवतमाळ येथुन वकीलीची सुरुवात केली. तसेच ईयत्ता 8 वी मध्ये लोकहीत विद्यालय, पुसद येथे शिकत असताना व्यसन मुक्तीच्या ला त्यांना आदिवासी युवक सेवा संघाची स्थापना करूण समाज सेवेस प्रारंभ केला व आपले समाज सेवेची कार्य करण्याचे ठरविले. आदिवासीच्या हितासाठी समाजाचे पैसे, वेळ खर्ची पडू नये या साठी आदिवासी सामूहिक मेळावे, सामूहिक विवाह यावर भर दिली. तसेच सन ।। सप्टेंबर 1972 साली मा. वसंतरावजी नाईक यांच्या अध्यक्षतेखाली कृषी उत्पन्न बाजार समिती, पुसद च्या प्रांगणात भव्य आदिवासी मेळाव्याचे आयोजन केले. तसेच ग्रामीण व मागास आदिवासी भागात लागू असलेला क्षेत्रबंधन कायदा हा आदिवासीच्या प्रगतीत अडथळा आणनारा होता हे त्यांच्या लक्षात आल्याने क्षेत्रबंधन कायदा रद्द व्हावे या करीता त्यानी प्रयत्न करूण क्षेत्रबंधन कायदा रद्द करण्यास नोव्हेंबर 1972 साली

जिल्हा अकोला येथे भेट घेतली व क्षेत्रबंधन कायदा रद्द करण्या बाबत सात्यात्याने पाठपुरावा केला व त्यांच्या अथक परिश्रमा मुळे अखेर सन 1976 रोजी क्षेत्रबंधन कायदा रद्द करण्यात आला. त्या मुळे आदिवासी समाजाच्या प्रगती मध्ये अडसळ ठरणा-या या कायद्यातून आदिवासी समाजाची मुक्तता झाली. शिवाजीराव शिवरामजी मोघे यांचा राजकीय जीवनात प्रवेश सन 1980 केळापुर मतदार संघातून झाला सदर चा प्रवेश महाराष्ट्र विधान सभेवर निवडून मंत्री असताना देशात सर्व प्रथम महाराष्ट्रा मध्ये नरबळी आणि इतर अमानुष व अनिष्ट प्रथा काळी जादू अधिनियम 2013 हा कायदा मंजूर करूण अंधश्रद्धा निर्मुलनाचा कार्याला गतिमान केले. विवेकी व समर्पित भावनेने दुर्बल घटकाच्या प्रगती साठी आपले राजकारण केले. जलसिंचन, व्यसन मुक्ती आंदोलन, सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन, तसेच शेतक-यांच्या हक्कासाठी पदयात्रा, यवतमाळ जिल्हयात विकासासाठी त्यांचे असलेले महत्त्वपूर्ण योगदान गडचिरोली अशा अतिदुर्गम जिल्हयात त्यांनी काम केले. वसंतराव नाईक आणि नेहरू, गांधी घराण्यांचे अनुबंध शिवाजीराव मोघे यांनी आदरपूर्वक जपले. तसेच शिवाजीराव मोघे यांनी महाराष्ट्र राज्याचे साडे बारा वर्ष कॅबीनेट मंत्री म्हणून काम केले व गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री, नांदेड, चंद्रपुर, यवतमाळ जिल्हयाचे पालकमंत्री व जवळपास नागपुर जिल्हयाचे आठ वर्ष पालकमंत्री म्हणून सेवा केली. शिवाजीराव मोघे यांनी नेहमी कॉग्रेस पक्षा सोबत एकनिष्ठ राहून काम केले त्यांनी राज्य कॉग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व पंधरा वर्ष अखिल भारतीय कॉग्रेस कमिटीचे सदस्य म्हणून कार्य केले. आंध्रप्रदेश, गुजरात, मध्यप्रदेश, आणि छत्तिसगड राज्या मध्ये पार्टीचे पर्यवेक्षक या पदावर राहुन जवाबदारी पार पाडली आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परीषदेचे उपाध्यक्ष होते. तसेच मा. शिवाजीराव मोघे यांचा आमदार, राज्यमंत्री, उपमंत्री, कॅबिनेट मंत्री असा नेत्रदिप प्रवास त्यांनी राजकारणात केला आहे. अथांग कष्टाने आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी राजकारणात यश मिळविले आहे.

संशोधनाचे महत्व (Importance of Research subject) :-

शिवाजीराव मोघे यांनी अनेक मंत्रीपदावर काम केले त्यांनी महाराष्ट्रातून समाजकारण ते राजकारणाला सुरुवात केली. देशाच्या विकासात महाराष्ट्राच्या विकासाच्या हितासाठी त्यांची भुमका काय होती हे अभ्यासण्यासाठी त्यांच्या कार्याचा अभ्यास करणे खुप महत्त्वाचे आहे. ई. स. 1980 पासून मा. शिवाजीराव मोघे यांच्या विधानसभा मतदार संघाच्या नेतृत्वाला सुरुवात झाली, त्यांचे कार्य कसे होते हे समजण्यात मदत होईल. आजच्या राजकीय परिस्थितीत नेतृत्व कसे करावे राजकारण, कसे करावे आणि सामाजिक व राजकीय विकास कसा करावा या साठी शिवाजीराव मोघे याच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करण्या साठी हा विषय निवडला आहे. शिवाजीराव मोघे यांनी पार पाडलेल्या तसेच राजकीय सामाजिक, शैक्षणिक सर्व भूमिका या खुप महत्त्वपूर्ण अशा स्वरुपाच्या होत्या. त्यांचे कार्य हे खुप व्यापक आणि आदिवासी गोर-गरीब घटकाच्या हिताचे असल्याने त्यांच्या राजकीय, सामाजिक कार्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या सारख्या कारणाचा शोध घेण्यासाठी राजकीय नेतृत्व म्हणून मा. शिवाजीराव मोघे यांच्या नेतृत्वावर संशोधन होणे आवश्यक आहे. म्हणून हा विषय अभ्यासासाठी निवडण्याचे ठरविले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Research object):-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्यापनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आले.

1. मा. शिवाजीराव मोघे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. मा. शिवाजीराव मोघे यांच्या राजकीय नेतृत्वाची पार्श्वभूमी जाणून घेणे.
3. मा. शिवाजीराव मोघे यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
4. मा. शिवाजीराव मोघे यांचा महाराष्ट्र विधानसभा या सभागृहातील कामकाजाचा अभ्यास करणे.
5. मा. शिवाजीराव मोघे यांच्या विकास कार्य विषयी दृष्टीकोण जाणून घेने.

संशोधनाची गृहीतके (Research hypothesis) :-

प्रस्तुत संशोधन विषया संबंधी संशोधनाने पूर्व अनुमानाच्या आधारावरती काही गृहीतके निश्चित केलेली आहेत. ते खालील प्रमाणे

1. मा. शिवाजीराव मोघे हे अभ्यासु सुसंस्कृत व जानते राजकारणी आहेत.
2. मा. शिवाजीराव मोघे यांनी राष्ट्रीय राजकारणातील खुप महत्त्वपूर्ण अशा स्वरुपाचे योगदान दिले आहे.
3. मा. शिवाजीराव मोघे यांनी आदिवासी क्षेत्रबंधन कायदा हटविण्यासाठी केलेली महत्त्वपूर्ण भूमिका.
4. मा. शिवाजीराव मोघे यांचे राष्ट्रीय काँग्रेस पक्षा मुळे राजकीय नेतृत्व विकासात हातभार लागला आहे.
5. मा. शिवाजीराव मोघे हे नेतृत्व व्यक्तिगत व परिस्थितीजन्य या दोन्ही कारणामुळे उदयास येते.

संशोधन समस्या (Research Problems):-

मा. शिवाजीराव मोघे सारख्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीला राज्य पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली त्यांनी राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य हे अभ्यासासाठी आकर्षणाचा विषय ठरला.

1. मा. शिवाजीराव मोघे यांचा राजकीय नेतृत्वाच्या जडण घडणीत राजकीय वारसा होता का?
2. केलापुर विधानसभा मतदार संघात आदिवासी मतदार बहुसंख्येत आहेत का?
3. मा.शिवाजीराव मोघे यांचे नेतृत्त्व उदयास येण्या करीता सामाजिक व आर्थिक परिस्थिती जबाबदार आहते का?
4. केळापुर विधानसभा मतदार संघ आदिवासी साठी राखीव असल्यामुळे मा. शिवाजीराव मोघे यांनी राजकीय पातळीवर (विधानसभा) नेतृत्व करण्याची संधी मिळाली का?

या दृष्टीकोनातून “शिवाजीराव शिवरामजी मोघे यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास” हा विषय संशोधनाचा भाग ठरत असल्या मुळे प्रस्तुत विषय हा अभ्यासासाठी निवडला आहे. या दृष्टीने शिवाजीराव मोघे यांच नेतृत्व हा विषय संशोधनाचा नियम ठरत असल्याने प्रस्तुत विषय हा अभ्यासासाठी निवडला आहे.

अभ्यास क्षेत्र (Area of Study):

प्रस्तुत संशोधना साठी "शिवाजीराव शिवरामजी मोघे यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास" या संशोधन समस्येचा अनुसंधाने
अभ्यास करताना केळापुर विधानसभा मतदार संघातील राजकीय नेतृत्वाचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology) :-

या संशोधनाचे स्वरूप हे सामाजिक शास्त्र पद्धतीने असल्या मुळे संशोधनात प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही माध्यमाचा वापर संशोधन प्रबंधाला दिशा प्राप्त करूण देण्यासाठी करण्यात आला यात ग्रंथालयातील संदर्भ साहीत्य, पुस्तके, आत्मचरित्र, अभ्यास पद्धत मुलाखत, विधान सभेतील दस्तऐवज, प्रश्नावली, राजकीय प्रकाशने, संदर्भग्रंथ, वाढदिवसा निमित्त गौरव अंक, मासिके इत्यादी सर्वेक्षणात्मक व विष्लेशनात्मक या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

संशोधन रूपरेखा (Chapter Planning) :-

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी पहीली लक्ष्यात घेता अभ्यासा करीता विषयाची मांडणी सहा प्रकरणात केली आहे.

1. प्रकरण पहिले :- प्रस्तावना

पहील्या प्रकरणा मध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या, विषय निवडीचे महत्व संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पद्धती, संशोधन आराखडा इत्यादी घटकाची चर्चा करण्यात येईल.

2. प्रकरण दुसरेः- मा. शिवाजीराव मोघे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात मा. शिवाजीराव मोघे यांचे बालपण, कौटुंबिक पार्श्वभूमी, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, त्यांच्या वर झालेले संस्कारांचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्याची सामाजिक व राजकीय जडन घडन कधी सुरू झाली हे पाहणार आहोत.

3. प्रकरण तिसरेः- राजकीय नेतृत्वाची बांधणी

प्रस्तुत प्रकरणात मा. शिवाजीराव मोघे याच्या नेतृत्व संकल्पनेचा राजकीय नेतृत्व कसे घडले यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे त्यांनी राजकीय नेतृत्व कसे केले याचा सविस्तर विचार या प्रक्रणात करण्यात येणार आहे.

4. प्रकरण चौथेः- शिवाजीराव मोघे यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य

सदर प्रकरणांमध्ये शिवाजीराव मोघे यांच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षणाचा तसेच चळवळीमध्ये केलेल्या सामाजिक कार्यांचा व वकिली व्यवसाय करताना त्यांची समाजाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी इत्यादींचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

5. प्रकरण पाचवे :- शिवाजीराव मोघे यांची राजकारणातील भूमिका व कार्य

प्रस्तुत प्रकरणात मा शिवाजीराव मोघे याच्या राजकीय महत्त्वपूर्ण भूमिका काय होती व राजकीय पदावरती कार्य केले याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. त्यानी कोण कोणत्या महत्त्वपूर्ण राजकीय पदावरती कार्य केले याचा अभ्यास या प्रकरणात येणार आहे.

6. प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणा मध्ये जे काही निष्कर्ष आणि शिफारसी निघाल्यात त्या विषयी या प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे एकदरीत सर्व प्रकरणाचा सार या प्रकरणात आलेला आहे. मा. शिवाजीराव मोघे यांचे राजकारण कशा स्वरुपाचे होते त्यानी समाज हितासाठी कसे कार्य केले याचा निष्कर्ष करण्यात आलेला आहे.

संदर्भग्रंथ सूची (Bibliography)

१. आदिवासी क्षेत्रबंधन व मा. इंदिरा गांधी - शिवाजी मोघे

२. समाज भूषण शिवाजीराव मोघे - उत्तम गेडाम

३. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती - डॉ. गोविंद गार

४. महाराष्ट्र विधान मंडळ, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा, प्रधान सचिव - विकास पाटील.

५. जलसमाधित मरसूल गावाची चिरंतन गाथा - सुधाकर पवार

६. भारतीय आदिवासी - गुरुनाथ गादागोंडे

७. भारतीय उत्थानाचा हाकारा - ग. शा. पंडित

८. Indians Tribes The Ages - R. C. Varma

९. The Central Provinces – R. C. Rasels

१०. The Scheduled Tribes – K. S. Shing

संशोधक

सुवर्णा तुकाराम खुडे

(एम. ए., बी. एड)

मु. पो. पाचुंन्दा ता, माहूर जि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा डॉ. खान. आय. जी.

(एम. ए. फिल., पीएचडी., सेट)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर